


म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2७६१७

REFBK-0023449
REFBK-0023449

# गावाकडच्या कविता

जगदीश देवपूरकर.

सा. काव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०००
२३००९
काव्य २८/२५८२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# || गावाकडच्या कविता ||

जगदीश देवपूरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0023449
REFBK-0023449

|| चेतश्री प्रकाशन ||

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखकांना अनुदान योजनेखाली अनुदान मिळाले आहे.

गावाकडच्या कविता
(मराठी काव्यसंग्रह)
२७ डिसेंबर, १९८१.
o
प्रकाशिका :
सौ. यशोदा सोनार,
चेतश्री प्रकाशन, देशमुख चाळ,
अमळनेर (४२५४०१).
o
कॉपीराईट :
सौ. जयश्री देवपूरकर,
'अमोल', नेहरुनगर,
धुळे (४२४००२).
o
मुखपृष्ठ व रेखाटने :
धनंजय गोवर्धने
o
मलपृष्ठ :
संजय देवपूरकर, नितीन ढगे.
o
ब्लॉक्स :
उत्कर्ष प्रोसेस, नाशिक.
o
मुखपृष्ठ छपाई :
साधना प्रेस, पुणे.
o
मुद्रक :
तापीराम चौधरी
मित्र प्रिंटिंग प्रेस,
नगरपट्टी, धुळे.
o
मूल्य : बारा रुपये

Gavakadachya Kavita
(Marathi Poetry)
Jagdish Deopurkar

संदर्भ काव्य
२४४४
२३४४९
[illegible]

आई–वडील आणि गुरुजन
यांच्या चरणी
ही गावाकडची कविता ...

– जगदीश

श्रेय : डॉ. सौ. सुमती खानविलकर; डॉ. इंदूताई नाईक, ज्ञानेश सोनार, रघू पांडे, राजा घुमारे, सुमित्रा साठे; रमेश चव्हाण, सुभाष भामरे, सुधीर जाधव, वीजमंडळ नोकर संघ, सिद्धेश प्रोसेस आणि सुवर्णकार युवक स्नेही.

## ...थोडेसे माझे

भुसावळ. तापीकाठचे गाव.
वीज मंडळात नोकरीसाठी
ह्या तापीच्या कुशीतील गावात
एक वर्ष राहिलो.
आणि येथेच गावाकडची कविता सुचली.
मग हळूहळू एकेक गाव
माझ्या कवितेला येऊन मिळाले.

'पाटणा देवी' परिसरात
'प्रणवानंद' नावाचे
एक तेजस्वी व्यक्तिमत्व आहे.
माझ्या फुलांच्या कवितेविषयी ते म्हणाले :
' जगदीश, फुलांवर कविता करणारे पुष्कळ आहेत.
आता जरा काट्यांकडे लक्ष द्या.'
आणि गावाकडची कविता
जखमी फकिरांच्या बादशहांकडे वळली.
थोडक्यात
ही कविता म्हणजे


गावच्या जखमांचा
एक न संपणारा इतिहास आहे.

माझ्या धडपडणाऱ्या शब्दांना प्रकाशात आणणारे
'अनाद'कार वा. रा.,
पोटच्या पोराइतकीच कवितेची काळजी वाहणारे
'अनुष्टुभ्'चे पुरुषोत्तम पाटील,
वेळोवेळी शाबासकीची थाप पाठीवर देणारे
युवकांचे मार्गदर्शक शशिकांत दैठणकर,
ज्यांच्या घरातून मला कविता कळायला लागली
ते गुरुतुल्य नागेश मोगलाईकर,
ज्यांच्या रेखाटनांनी कवितेचा आशय रेखीव केला
ते चित्रकार धनंजय गोवर्धने;
सुबक छपाईचे लेणे ज्यांनी पुस्तकाला चढविले
ते 'मित्र प्रेस'चे तापीराम चौधरी व त्यांचे सहकारी,
आणि
नवोदित लेखक-कवींचे आशास्थान
'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ'

यांच्यामुळे ही गावाकडची कविता
वाचकांपुढे येत आहे.
हे ऋण कधीही न फिटणारे.


– जगदीश देवपूरकर

## ‘चैत्र शुद्ध एक’ला



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

ही नक्षी उतरली.
गावच्या गर्भात
एक ओळ सुचली –
“ गुढी उभार गुढी माडी
गुढीला लाव फाटकी साडी.
पुसू नको कालचा डाग
गुढीला आमच्या येऊ दे जाग.”
आईच्या फाटक्या पदराची शपथ ...
बाप बोलून गेला म्हणून
लावतो गुढी दारात.
गावात मढी जळतात घराघरात.
गुढीच्या कपड्यापेक्षा महाग
मुड्याला पांघरलेला मांजरपाटी.
मखमली कपडा जाळून टाकतो
मी गावात
‘चैत्र शुद्ध एक’लाच.



२.

गावच्या चौकात
ओरडतो भर बालकवर्षात
एक पोरगा –
‘ पॉलीश, बाबू पॉलीश.’
पॉलीशच्या रंगात
काळवंडून गेल्या
हस्तरेषा –
गावच्या ,
पोराच्या.

३.

गावची पोरं
गावालाच मारतात शीळ.
गावच्या गालावर
लाजतोय् डामरी तीळ.
गावाला इशारा करते
गावची नजर.
गावाला गावच्या गाण्याची
नसते खबर.
गाव कधी खोदत नसते
स्वत:ची संगमरवरी कबर ...

४.

एक गाव दुसऱ्या गावाला
धावती भेट देते
कधी पावलांनी;
कधी चाकांनी.
गावोगावची माणसं
गावात घर करून राहतात
गावाला मात्र घराशिवाय
पारावरच थांबवून ठेवतात ..

५.

‘ सदरहू गावची ग्रामपंचायत
आपले स्वागत करीत आहे ’
– बाईनं बोर्डाला वाईच
नमस्कार केला.
रात्रभर वाईच्या स्वागतात
एक दिवा जागला.
पहाटेच्या पावलांवर पाऊल टाकीत
वाई रस्त्यावर थांवली.
बोर्ड पुन्हा स्वागताला –
‘ आपला प्रवास सुखाचा जावो ! ’

६.

ह्यानंतर कृपया कुणी
बोली बोलू नका गावची.
विकली तेवढी अब्रू
पुरेशी आहे.
पुढच्या बाजाराला गावाचं शील
लिलावात काढू या.
दर वेळेला तुमच्या मापात
गावचं पुण्य विकू या.
जेव्हा पुण्य निकालात निघेल
तेव्हा–
गावचा बाजारच बंद करू या.

७.

गावच्या भिकाऱ्यांनो,
गावासाठी
भीक मागा.
‘ गाव वेशीवर
उपाशी आहे ’
हे भर दुपारी
भरल्या दारी सांगा.

८.

जर गावातल्या मंदिरात
गर्दी वाढली माणसांची
तर समजा–
गावच्या अंगावर
कुणीतरी, कुठंतरी
पाप टाकून आलं आहे.



९.

गावात गांधी
घराघरात, भिंतीवर.
गावच्या खुनाची रोजच चर्चा
रंगते गावाच्या पारावर.
गावच्या बापाचं एकदाच
श्राद्ध वर्षाच्या अंगावर.
गावची पोरं गावालाच
खेळवतात अंगा–खांद्यावर
शांत आहेत पक्षी गावचे
(समजत नाही ... )
का ह्या वडाच्या फांद्यांवर ?

१०.


आई झोपावी शांत
म्हणून गावची पोरं
दिवसा जागतात.
मध्यरात्रीला पोरं झोपावीत गावची
म्हणून आया जागरण करतात.
दुरून येणाऱ्या मशाली
राखेची खुशाली सांगतात.
रंग राहावा जातीचा
म्हणून आया जागरण करतात.

११.

महारोग्यांच्या रक्ताची लहर
रोमारोमात घेतली भिनवून त्याने.
जखमेच्या जीवघेण्या वस्तीत
जीवच ओवाळून टाकला त्याने.
तेव्हापासून तो गावात
‘जखमी फकीरांचा बादशहा’
म्हणून गणला गेला.
त्याच्या रक्तात रोज
एक सूर्य होतो जागा.
महारोग्यांची जखम मिटते
त्याच्या एका नजरेत.
एकदाच दोस्तांनो याल का
चौपाटीची वाळू सोडून,
ह्या बाभळाच्या वनात –
निवडुंगाच्या रानात –
माझ्या गावच्या आनंदवनात ?

१२.

पाटाचं पाणी
थाटात वाहतं
गावच्या शेतातून.
गावात एका विहिरीला
एकच बादली अडकते
जातीच्या रहाटातून.
ये माझी माय,
तू दुधाची ग साय !
तुझ्या दुधात भी आता
जातीचा का रंग हाय ?



१३.

सारे हिशोब
पालथे घाला एकदा
पान पान पाहून झालं तरी ...
गावच्या हिशोबात
राहून गेली एक चूक
कुठल्या तरी घराच्या नावे
राहिली टाकायची
दहा दिवसांची एक भूक.
चूक लवकर शोधा दोस्तांनो,
त्याशिवाय
गावच्या भुकेच्या 'वार्षिक ताळेबंद
कसा जमेल ?

१४.

फुटलेल्या बांगड्यांच्या
काचा उचलीत
तिने कपाळाला हात लावला.
भर दुपारी
गावचा सूर्य ढगाआड झाला ...

१५.

युद्धाची किंकाळी संपल्यावर
गावच्या पोरी दारात
कुंकवाची वाट पाहतात.
पोस्टमनची वाट पाहून
गावच्या बांगड्या जगत राहतात.
देशाच्या ध्वजाजवळ
मंगळसूत्राचं दान मागत असतात.
गावाला पेपर
विजय सांगून जातो.
पोस्टमन दारात
'गाव विधवा झाल्याची'
तार टाकून जातो.



१६.


बऱ्याच दिवसात
गाव पाहिलं नाही.
शेणानं सारवलेली माती,
प्रेमानं भारलेली नाती,
नियमित तेवणाऱ्या वाती,
एकत्रित जगणाऱ्या जाती –
बऱ्याच दिवसांत गाव पाहिलं नाही.
खरं सांगू दोस्तांनो !
गावात आता तसं काहीच राहिलं नाही.

१७.

जी विझवायला हवी
तीच पेटविली
जातीयतेची होळी.
गावच्या बाहेर उपाशी झोपडया
आणि गावात तुपाची पोळी.
लक्षात ठेवा,
संरक्षणाचा पहिला बळी
पहारेकरी असतो गावात.
आता तोच सोडून
आला पहारा
गावात तर ?

## १८.

चौसटच्या कॅलेंडरला
सत्तावीस बाराला
बा नं  खूण केली,
लिहलं –
‘ पोरगं झालं.’
गावात रात्रभर
बा येड्यासारखा
माझा जन्म
घेऊन फिरला.
आंबेडकरांच्या पुतळ्याला
हार घालून आला.
माझ्या जन्माची साखर
सकाळी वाटायला बा गेला.
आयच्यान् ...
आख्खी साखर
तशीच घेऊन परत आला.
तवापासून ...
माझा  बा
माझ्या जन्माची जात
अंगावर फेकून गेला.



१९.

गावच्या मैफिलीला
साद देते गावची जमीन.
गावच्या गाण्याला
साद देतात गावचे पक्षी.
गावच्या रंगात
न्हाऊन निघतात गावकरी कधी कधी.
गावच्या विष्ठेला
निष्ठेने वाहणारा
भंगी नाही करीत
साजरा सण कधी-मधी.
गावची व्यथा गाव,
गावकुसावर टागून ठेवते.
गावच्या गावकऱ्यांना
स्वतःची ओळख म्हणून
गाव स्वतःचं नाव देते.

२०.

विटेवर रच वीट
गाव उभी करी नीट.
पंढरीच्या पांडुरंगा –
एक वीट ती ही फिट.
सारं झालं बांधून घर –
छताचीच बाब आहे.
आभाळाचा तुकडा एक
घरावर येत आहे.
गावच्याच ढगातून
पाऊस आता येत राहील.
जागे व्हा जमिनींनो,
झोपेत पाऊस निघून जाईल.

## २१.

गावोगावी गल्लोगल्ली
त्याने गावे पालथी घातली.
तबल्याच्या ठेक्यात
तुटणाऱ्या घुंगरांची
चाळ त्याने पाहिली.
तोंडातून वाफा ओकणाऱ्या गळ्यात
विजयाची माळ त्याने पाहिली.
थुंकी झेलणाऱ्यांची वाचा मूक !
घाम पिणाऱ्याला कसली भूक ?
फुटपाथच्या अंगावरची
राख त्याने पाहिली.
जी आलीच नाही गावी
ती पावसाची सर त्याने पाहिली.
गावोगावी रस्तोरस्ती
सस्ती दुनिया त्याने पाहिली.

## २२.

अंगठा घेऊन
गावच्या कचेरीत
तिला परगावच्या दादल्याने
दिली काडीमोड ...
कुंकू स्वस्त करणाऱ्याच्या
गावात मी आलो.
दारादारात करंडे सांडलेले
कुंकवाचे.
प्रत्येक दारावर पांढऱ्या कपड्यांचे
उध्वस्त तोरण
ह्या गावच्या जमिनीत कोणी लावले ?
उध्वस्त कपाळांचे
कोरडे कुरण !
कपाळ, कुंकू... बुक्का,
चुकणारे हात त्यांचे –
गावच्या नशिबी ठपका.

२३.

अगदी जल्लोषात त्यांनी
गाव जाळून टाकले.
सराईतासारखे.
दुरून पाहणाऱ्याने सांगावे –
गावात ही अपसुक दिवाळी का ?
आणि
जवळच्याला कळू नये
ही ठरवून पेटवलेली होळी.

२४.

तिला निरोप देताना
गाव गहिवरलं.
काहीसं घाबरलं,
थोडंसं सावरलं.
गावच्या अंगावर
हळदीचे पाय सोडून जाताना
तिने गावाकडून थोडासा
चिखल घेऊन
उगाचच आपले तळहात माखले...

२५.

जत्रेची आठवण म्हणून
गावात भर चैत्रात
नाव गोंदवून घेताना हातावर
ती म्हणाली : 'तुझी आठवण !'
हसला गोंदणारा, म्हणाला :
'चुकलाच हिशोब तर ...
जत्रेला या पुन्हा – पुढच्या साली –
मी नाव पुसूनही देतो
याच जत्रेत.'

२६.

गाव तिष्ठत आहे
हाती अक्षता घेऊन.
सारं आटपलं की
मला सांग तुझं आपलं –
'मेंदी हातावर पेरनं
कपाळी चंद्रकोर गोंदनं
केसांत फुलांचं फुलनं
कानात डुलाचं डोलनं...'
लवकर सांग सये,
आता माझ्याच
होऊ पाहात आहेत
अ क्ष ता...

२७

तिला सांगा
"निरोप देताना
एस. टी. तून  असं
रडायचं नाही."
हीच गाडी पुन्हा
याच गावाला येते
हे तिला कधी समजायचं !

२८.

देवघरात काय लोणचं
घालून ठेवायचं संस्कृतीचं ?
अरे बाहेर वस्त्या जळतात.
तुम्ही देवघरात कापूर जाळता !
सारं गावच होतं हे कापूर;
तुम्ही आपली जपता माळ,
आरतीआधी तुमच्या
उध्वस्त होते गावची एक चाळ.
लुटणारे लुटून नेतात पदर.
तू पसरवून पदर, देवाजवळ भीक माग.
इतकं ओरडूनही पोरी,
तुझ्या गावच्या देवाला येत नाही कशी जाग ?
देवघरातल्या देवा,
एकदा रस्त्यावर येऊन जा.
गावची मथुरा झाली चारा –
एकदाच मराठवाडा पाहून जा.
देवघरातल्या देवा,
एकदा रस्त्यावर येऊन जा.

२९.

तुझी गर्भार आठवण
वाऱ्यातून गावच्या
घरात आली.
मी गावच सोडलं
आठवणीची साठवण
होईल म्हणून ...
तुझ्या गर्भाला दान
माझ्या आयुष्याचं पान.



३०.

पोरी, तू पाठमोरी.
पोरी, गोरीमोरी.
पोरी, तू
पदरात चिंचा बांधून
आवळ्याच्या झाडात
का शिरलीस ?

३१.

गाव आयुष्यभर बाळगून
असते उबळ खोकल्याची.
गावच्या वेदनेला
तसे सबळ पुरावे नसतात.
मग गाव जखमा
अंगावर घेऊन
जगत राहतं...

३२.

तिच्या मुठभर आठवणी घेऊन
मी माझ्या मुठीतच
वसविले एक गाव.
जाण्यापूर्वी ती गावातून
माझ्या मुठीतल्या गावाला
हवं आहे एक नाव.

गावातून जाताना
अखेर तिने
कुंकवाची कोर
कपाळावर कोरली.
तेव्हा गावचे आरसे
ऊन नसताना
तडातड तडकले...



३३.

रात्रीच्या मैफिलीत
तू गावात
गाणे पेरून आलीस.
पहाटेला भैरवीच्या
मिटणाऱ्या फुलातून
प्रकाशाचं मूल
बाहेर आलं.
तुझ्या मैफिलीत आता
चंद्र जागून
चांदण्या झोपतात.
मैफिल तू
रंगवतेस ?
की मैफिल तुला रंगवते ?

३४:

ह्या गर्दीतून
आठवणीची गुंतागुंत
सोडवताना –
गर्दीतून तिचा
निसटता हात
सोडताना ......

आता गर्दीच नकोशी होते
गर्दीच्या गावात
ती नसताना !

३५.

पापण्या ओलावून
अश्रूंचा अभिषेक
हे गाव सोडताना.
मन आवरून
हुंदका अस्पष्ट
तुला निरोप देताना.
ओठावर हास्य,
पोटात रहस्य
तू परगावी जाताना !
सूर्य विझतो
चंद्र जागतो
तुझी वाट पाहताना.
हे सारं काही घडावं
कळी पहाटेआधी फुलताना.

३६.

गावाच्या मातीशी
गावाची पावलं
गावाशीच नाती
तोडून टाकतात –
ज्याला गर्भाची भाषा
नाही समजत
ते गावात
गर्वाची भाषा करू लागतात...

३७.

खिडकीचे गज धरून
ती ह्या गावच्या
सूर्याला हाकलून
चंद्राला कुशीत घेते.
ह्या खुशीत
रात्र सारी निघून जाते.
तुमच्या दुनियेचं
उसनवारीचं हास्य घेऊन
गावच्या अंगावर
ती देह सारा सोडून देते.
उतरत्या वयाचा
उतरता हिशोब
मालकीण तिला करून देते.
खिडकीचे गज तोडून
आता ती
गावच्या चंद्राला चिरडून
सूर्याच्या उन्हाला
कुशीत घेते ...

३८.

बंद पाकिटातून तिने
गावचा पाऊस...वारा...ऊन...
वगैरे...वगैरे...
बंद पाकिटातून तिने
हाल...अहवाल...
वगैरे...वगैरे ..

बंद पाकिटातून तिने
घरदार...वार...वगैरे वगैरे...
एका बंद पाकिटात
तिने आख्खं गाव बंद केले.
बंद पाकिट उघडताना
तिच्या चवदार अश्रूंनी डकवलेली
नियमबद्ध तिकिटे...
बंद पाकिटातून गाव हातात येताना,
बंद पाकिटातून गावची
बोली भाषा वाचताना,
मी खिडकी करतो बंद.
बंद पाकिट वाचताना
सारे गावच देते हुंदका
बंद पाकिट फोडताना...

३९.

चांदणे मोजून झाल्यावर सांग,
मला चंद्र विझवायचा आहे –
ढगाआडच्या बाळाला
उद्यासाठी जागवायचा आहे –
चांदणे मोजून झाल्यावर सांग,
किती गावली ? किती राहिली ?
सूर्याची पिलावली ?
गावच्या कुशीत
कुठल्या नक्षत्राची खुषी राहिली ?
चांदणे मोजून झाल्यावर सांग,
चंद्राच्या डागाची आपली खुषाली...

४०.

रक्ताशी नाती सांगता येत नाहीत
अन् गावच्या मातीशी
इमान राखायला निघालात !
हळू बोल मुशाफिरा,
गावाने कालच कोठे शांतपणे
डोळ मिटलेत.
अद्याप नाही विझल्यात
नळकांडचा धुराच्या...

४१.

गावच्या म्हाताऱ्याने
विझण्यापूर्वी –
दोन डोळ्यांचा एक सूर्य
गावाला बहाल केला.
कुठल्या धुंदीत गावानं
कालच्या व्यापाऱ्यांना
त्या सूर्याचा
जाहीर लिलाव केला...

४२.

वस्तीला जाग येते हे पोरी,
पदर सावरून घे.
पेटते ही ज्योत सूर्याची
दिवा रातचा मालवून दे.

कोंबडं नाही आरवायचं आता
काटक्यांची खिडकी उघडून दे.
पक्षीही नाही ओरडायचे
डोळ्यांचे पंख फडकवून घे.
पोरी, पहाट पावसाची की पावलांची ?
पहाट पापाची का पुण्याची ?
हिशेव आताच जमवून घे.
रात्री पुन्हा पापात जाशील
गावचा दरवाजा लावून घे.

४३.

ओंजळीत पाखरू गेले टाकुनी गाणे
पहाटेच्या पापणीत ओले झाले उखाणे.

फूल तेच, चमन तोच, सोनियाचे लेणे
ओंजळीत आमुच्या पेटलेली राने.

उभी अशी आरतीला - संगे कर्पुरी बहाणे
देवाजीच्या दारी झाले कोणा जिवाचे देणे.

होती आशा पावसाची, कसे नभ नाही आले ?
तुझ्या मोतीदार आसवांनी घर झाले ओले.

कसा खेळ ? झाला वेळ - गेले कोठे पक्षी ?
रेशमी पदरांवर कुण्या गावची ही नक्षी !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र.
संद. शाखा (स्थळ प्रत)

४४.


पोळून निघताहेत पाय,
जमिनीला बसतात चटके हाय !
आकाशातच फुटतात अश्रू,
त्यांच्या सांत्वनाचे काय ?
राग येणाऱ्या समुद्राला
शांत करण्याचा उपाय काय ?
दिवसाला तुझीच यावी याद,
रात्रीच्या स्वप्नांच्या हिशोबाचं काय ?
आयुष्य होते हे चंदन,
झिजणाऱ्या देहाच्या राखेचं काय ?
आमचा वरून हिशोब लिहणाऱ्या देवा,
तुझ्या लेखणीच्या आयुष्याचं वय काय ?

४५.

चार भिंती,
एक दार,
दोन खिडक्या
(त्याही मोडक्या),
एक ओटा
(तोही छोटा),
'मी'
माझ्या मुलांची 'ती'
असे आम्ही एकूण पाच.
पगार एकशे पाच.
प्रत्येकी एकवीस.
जीव होतो कासावीस.
तसा मी दुःखी आहे –
पण संसार माझा सुखी आहे.
कारण......
बायको माझी मुकी आहे.

४६.

सप्तपदीच्या पावलांतून गेलेली तुझी
पारिजातकासारखी पवित्र पहाट
मला रात्रभर जागे करून गेली.
अंगाअंगाने मोहरलेली तू
माझा मोहर नष्ट करून गेलीस.
आकाशाला नाते सांगण्यासाठी
क्षितिजापर्यंत तू चालत आलीस.
कुणा कवीची कविता होऊन
शब्दांत त्याच्या बोलत आलीस.
तू आलीस, गेलीस. कविता झाली.
शब्दांना टाकून निघून गेलीस.
आसवांची आता कहाणी झाली.
तुझी कविता संपत आली.
सप्तपदीच्या पावलांतून गेलेली
तुझी पारिजातकासारखी पवित्र पहाट
मला रात्रभर जागे करून गेली.



४७.

ती गावात आली
तशी गावचीच झाली.
गावानं दिली तिला
मायेची चादर,
अंगावर पदर.
सारा अभिषेक गावानं
तिच्यासाठी एकदम केला.
जेव्हा गावच्याच मनात
पाप दाटलं –
कोण शिवल देवा अन्न ?
जिथं सारं तिच्या
अंगचंच पदर फाटलं...

४८.

श्वास तुझा माझा असा
सात जन्मीचा हा वसा
भाळी रेखाटला कुणी
कपाळी कोरीव हा ठसा ?

गोऱ्या गळ्यातील गाती
गीत काळेभोर मणी
तुझ्या अंतरीची कथा
येईल कुणाच्या ग ध्यानी ?

तू सुगी शेतातील
जशी सजली धरणी
तुझ्या पुण्याईने आले
बंद नारळात पाणी.

तुझी वाणी अनवाणी
मुखी ओसंडते बाग
नयनी वाहते ग पाणी
कुठे पेटते ही आग ?

४९.

अंगावर ऊन पांघरून
सावलीत उभे राहण्याचे हे दिवस नाहीत.
हातात चांदणे घेऊन
क्षणभर चंद्र पाहण्याचे हे क्षण नाहीत.
तुझ्या सुंदर चेहऱ्यावर
चांदणे पेरून बेफाम होण्याचे
दिवस आता संपलेत.
हातात वाळू असेपर्यंतच
समुद्र आपला वाटावा
असे किनारेही आता संपलेत.
मनाचा झोल जातो
तोल सावरताना,
ओठावरच शब्द गोठतात
थोडंसं काही बोलताना.
मला तर आयुष्य पेरायचं
तुझ्या अंगणात.
रांगोळी रंगवण्यापूर्वी सडा टाकताना
मला तुझ्या अंगणाची
जातकुळी सांगशील का ?

५०.

दिवसभर गजरा गुंफून
ती कट्ट्यावर,
चौकात, भरवस्तीत,
घुंगरांच्या बाजारात,
गजरा हातातून केसांत
पेरण्यासाठी
रात्रभर ती
फुलांच्या सुवासात.
रात्रभर गजरा विकताना
शेवटी तिचाच होतो गजरा.
फूल फूल होते उध्वस्त,
पुन्हा ती तशीच माळते गजरा,
होते गजरा, विकते गजरा.
आता सवय झाली तिला
गजरा विकण्याची,
गजरा होण्याची.
मैफिलित गजरा हातात सुकतो,
केसात झुरतो.
गजरा गजर न करता
अखेर
मैफिलीत संपतो...



५१.

ह्या शहरातून भर रस्त्यात
मनालाच फुटतात असंख्य रस्ते
तुझ्या मनाचा पत्ता नसताना.
पावलांचा प्रवास रस्त्यावरून
रीतसर मनोमनी फिरताना.
रस्ता कधी-कधी
पावलांवर रुसताना.
तिच्या आठवणी
रस्तोरस्ती घसरून पडतात.
प्रत्येक पावलावर
सावरायचा निष्फळ प्रयत्न
आयुष्याचा गुरुत्वमध्यच मुळी
ठीक नसताना.
तिच आपलं ठीक आहे –
सहाऱ्याच्या बांबूवर ती
सांभाळून ठेवते मनाचा तोल.
तेव्हा आपल्या आठवणी
ठरतात मातीमोल.

५२.

हा गावचा बाजार कसला आहे ?
येथे मालच कोठे नाही दिसत
ना तराजू, ना वजन,
ना भावफलक, ना बोर्डाची झलक.
तरी बाजार व्यवस्थित चालू आहे.

या ना, आत या.
बसायचं ?
नाही.
का ?
पाच फार होतात.
मग चार ?
नाही. तीनच आहेत.
बर या.
किर्र ऽ ऽ ऽ आई ऽ ऽ का ऽ हो ऽ
डिस्चार्ज.
अस्ताव्यस्त झालेल्या पातळाला
हात सावरताच
सरळ अस्तित्व येते.

मी बाजार पाहतो
फक्त पाहतच राहतो.

बाजारात माल दिसत नाही.
"इन्ही लोगोने, इन्ही लोगोने, ले लिया..."
लाईट बंद.
मैफिल चालूच.
अंधाऱ्यात तबल्याचा ठेका,
घुंगरांचा आवाज.
एका हातात गजरा मोगऱ्याचा –
वाहवा ऽ ऽ वाहवा ऽ ऽ
( वहात चालला भडव्यांचा थवा. )
जबाब नही !
क्या बात है मेरी जान !
( भडव्या, घरची बायको मेली काय ? )
यें ले पैसा ... पैसाच पैसा ...
काळा पैसा, धवळा पैसा,
खोटा पैसा, रांडचा पैसा.
फिर आज रात ?
सौ रुपया नाईट.
ठीक है.
नाईट–गाऊनमधील रात्रभर
पोस्ट मार्टेम.
प्रभात–समय.
सकाळचे सात वाजताहेत.

आता ऐका भूपाळी –
“ घनःश्याम सुंदरा श्रीधरा...”
हे मात्र गाढ झोपलेले,
गाढ झोपलेले,
अगदी गाऽऽढ झोपलेले...

५३.

आता बंद करू या
अंधारातील
आंधळी कोशिंबिरीचा
हा आंधळा खेळ.
काहीच नाही गावलं
तुझ्या गावात.
ह्या शोधात
मीच हरवलो
माझ्या नादात –
नेहमी तूच करावीस बंद
बांधून बंद पट्टी
उजेडाची दिशा.
हातात सूर्य असून
डोळ्याची बंद पट्टी
कोठून दाखवेल
उद्याची आशा ?
एकदाही नाही घेतलीस
बांधून बंद पट्टी
कधी तुझ्या
सोनेरी डोळ्यांवर.
राजकुमार शोधतच राहिला

हरवलेल्या राजकन्येस
बेफाम वाऱ्यावर.
तुझी परवानगी असेल तर
सोडू का ही
जीवघेणी अंधारगुहा ?
तू हो म्हणालीस.
अंधारलेले काजळी डोळे
माझे बावरले.
तुझ्या कपाळावरच्या
कोरीव कुंकवावाचून सावरले.
त्यांना खरंच नव्हती सवय
उजेडातील रोखठोक
भाषा वाचण्याची.
तुझ्या गळ्यात दाटलेला
मंगळसूत्री हुंदका
तेव्हा बरंच काही
सांगून गेला ...

५४.

फुलं उध्वस्त होतात,
क्षणमात्र
देवाच्या पायावर पडून
फुलं संपून जातात
क्षणभर जगून.
पाहता पाहता फुलांची यात्राच
भरते देवासाठी.
फुलांचा जन्म हा
असा कशासाठी ?
ह्या प्रश्नाचं उत्तर
हवंय् मला
फूल झाडावरून
पडण्याआधी...

५५.

पावलापावलावर मेंदी पेरलीस
आणि जमिनीला रंगवलंस
बेभान होऊन.
कधीतरी स्वतःच्या उध्वस्त हाताचा
विचार केलास का ?
प्रत्येकाच्या हातात
हिरवा चुडा भरताना
कालच टिचलेल्या
तुझ्या बिलोरी
बांगडयांच्या काचा
कुठं ठेवल्यात ?

५६.

तू रामायणातला राम झालास
तरी सीतेचं पद मला देऊ नकोस.
अरे,
माझ्यासाठी युद्ध खेळतोस
आणि मलाच सोडून देतोस –
हा इतिहास मला सांगू नकोस.

५७.

कबूल की
केशकलापात तुझ्या
शोभतो गजरा मोगऱ्याचा.
म्हणून गरज नव्हती
सारा बाग उध्वस्त करायची...

५८.

आता गावचा इतिहास
गावच्या रक्तानं
लिहू या ...

एक पेटलेलं होमकुंड
दीडशे वर्षे वयाचं
ह्या गावात होऊन गेलं.
गावचा वंश संपवून
गावाला पंधरा ऑगस्ट
देऊन गेलं.
नदीच्या थेंबात
साठवून ठेवलेली ह्या
गावची संस्कृती...
ह्या गावच्या नदीवर
मृत्यूचं होणारं पिंडदान...
दुष्काळी कावळे
पिंडाला शिवतात.
गावचे आत्मे असे कसे
तृप्त होऊन जातात ?
ह्या गावचा इतिहास
पिंडाच्या कावळ्यावर

लिहू या ...

येथून तेथून
भर उन्हात सावली
देणारी झाडं
ह्या गावातून उन्हाला
घाबरून झाली फरार.
गर्दीला घाबरून
गावच्या मंदिरातून
देवही झाला पसार.
ह्या गावचा इतिहास
सावली सोडणाऱ्या
झाडांवर लिहू या ...

सकाळच्या जात्यावर
भरडल्या जाणाऱ्या
दाण्यांतून बाहेर पडणारी
पहाटेची गाणी ...
मोटेतून पाण्याबरोबर
वाहणारी पाणीदार लावणी...
ह्या गावच्या
काळचा छावणीवर
इतिहास लिहू या ...

सुखांची साठवण
करणारं हे गाव
डोळ्यांत दडवून ठेवतं
दुःख असलेलं नाव.
गावच्या गोठलेल्या
अश्रूंवर
आता इतिहास
फ्रीझ करून ठेवू या ...

इतकं पेरूनही पुण्य
ह्या गावच्या जमिनीतून
पापच पडावं बाहेर !
येथल्या काही
भिंतींना हवा आहे
अजूनही न मिळालेला
प्रीतीचा आहेर !
ह्या गावात ज्यांना
कधी डोहाळेच लागले नाहीत
त्या गर्भांवर
इतिहास लिहू या ...

प्रत्येक घर जाळल्यावर
मग हे दिवे

पुन्हा कसले जाळतात ?
उध्वस्त बागेतली फुलं
पुन्हा पुन्हा
केसांवरच का माळतात ?
केसांवर होणाऱ्या
फुलांच्या आत्महत्त्येवर
गावचा इतिहास लिहू या ...

सोनं लुटावं शिमग्याला –
ह्या गावात
सुख लुटून मुक्त होतात.
दुःखाच्या काठावर
ऊर फुटून अश्रूंच्या
प्रवाहात सुस्त होतात.
येथल्या सुखातल्या सोहळ्यावर
अश्रूंची किमत ठरवू या.
जे मोजू शकत नाही दाम
त्या अश्रूंच्या इमानदारीवर
इतिहास लिहू या ...

ह्या गावचं सुख
हसत हसत चांदण्या
सोडून अंगावर,

चंद्र, अंधारात निघून जातो –
तिच्या प्रत्येक शब्दाला
रात्रीच्या कुशीत
झोपवून जातो –
तिच्या रात्रीच्या हुंदक्यावर
आता दीर्घ उसासा ठेवून
प्रदीर्घ इतिहास लिहू या...

फुलांना जखमी करताना
जे काटे घायाळ झालेत,
त्यांच्या काटेरी
आयुष्यावर
इतिहास लिहू या...

ह्या गावच्या ज्या
पायांना वाटा
दिसू नयेत,
कुठल्या अंधाराला
उजेडाची स्वप्ने पडू नयेत,
येथल्या राहिलेल्या
मूठभर प्रकाशावर
टीचभर इतिहास लिहू या...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
(स्थळ प्रत)

समुद्र पिऊन किनाऱ्यावर
येऊन पडलेले ह्या गावचे अवशेष.
घरावर सूर्य झेलताना
क्रांतीचे भग्न झालेले लवलेश.
भाकरीच्या पोपड्याआत
क्रांती फिरवणारे
झाले आहेत नामशेष.
जो पहिला नांगर
ह्या गावच्या मातीत रुतला
त्याच्या फुटलेल्या
पहिल्या पालवीवर
इतिहास लिहू या...

ह्या गावाला ज्यांनी
सर्व काही गमवून
बरंच काही दिलं
त्यांच्या घरातल्या
विरलेल्या हुंदक्यांवर
गावचा इतिहास लिहू या...

REFBK-0023449

REFBK-0023449